देवगड महाविद्यालयामध्ये आतंरराष्ट्रीय योग दिवस साजरा.

महाविद्यालयाचे NCC unit, NSS आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये आतंरराष्ट्रीय योग दिवस निमित्त योग, प्राणायाम प्रशिक्षण आणि सराव सत्राचे आयोजन करण्यात आले होते. देवगड येथील पतंजली योग केंद्राच्या मा. खाडिलकर यांनी उपस्थितांना नियमित योगाभ्यास आणि प्राणायामचे महत्व विषद करून योगासने, सूर्यनमस्कार आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच या सत्रास उपस्थित विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आणि योगासने प्राणायाम यांचे प्रशिक्षण घेतले.





